RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक ६९(४)] मंगळवार, जून ८, २०२१/ज्येष्ठ १८, शके १९४३ [पृष्ठ ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जून २०२१.

**आदेश**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस-०३२१/प्र.क्र. ५७/राउशु-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन आदेश, गृहविभाग, क्रमांक एमआयएस-०१११/प्र.क्र. ५/ राउशु-३, दिनांक ५ मार्च २०१५ अन्वये, दिनांक १ एप्रिल २०१५ पासून राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील, त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुज्ञप्त्या व परवाने देण्यास मनाई केली होती.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १२ जानेवारी २०२१ अन्वये चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदीबाबत परीक्षण आणि सर्वंकष अभ्यास करण्यासाठी रमानाथ झा समिती नियुक्त केली होती.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने रमानाथ झा समितीच्या अहवालासह जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समिक्षा समितीचा अहवाल आणि प्राप्त निवेदने विचारात घेऊन, चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविण्याचा निर्णय घेतला आहे, त्याअर्थी, आता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) च्या कलम १३९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) आणि (ढ) तसेच, महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम (१९०४ चा १) च्या कलम २१ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे या आदेशाच्या **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक एमआयएस-०१११/प्र.क्र. ५/राउशु-३, दिनांक ५ मार्च २०१५ रद्द करीत आहे.

२. शंका निरसनासाठी, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, दिनांक १ एप्रिल २०१५ पूर्वी देण्यात आलेल्या व दिनांक ३१ मार्च २०१५ पर्यंत वैध/अंमलात असलेल्या आणि दिनांक ५ मार्च २०१५ च्या आदेशासोबतच्या अनुसूचीमध्ये निर्दीष्ट केलेल्या अशा कोणत्याही प्रकारच्या अनुज्ञप्त्या व परवाने हे, खाली नमूद अटींच्या पूर्ततेनंतर पुन:प्रदान करण्यात येतील.

(क) उक्त अनुज्ञप्ती दरम्यानच्या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्याबाहेर स्थलांतरीत झालेली नसेल.

(ख) पात्र अनुज्ञप्तीधारक अनुज्ञप्ती पुनःमंजुरीसाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात अर्ज दाखल करेल.

(ग) सदर अर्जासोबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना क्रमांक बीपीए. ११२०२१/२०२१-२२/सात, दिनांक २८ जानेवारी २०२१ नुसार, सन २०२१-२२ करिताचे अधिसूचित केलेल्या व लागू असलेल्या अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात करून पुनःमंजुरीच्या अर्जासोबत त्याचे चलन सादर करील.

(घ) पात्र अनुज्ञप्तीधारकास त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ५४(१) (घ) मधील नमूद कलमांन्वये गुन्हा शाबितीकरण होऊन शिक्षा झालेली नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(च) पात्र अनुज्ञप्तीधारकांकडे दिनांक १ एप्रिल २०१५पूर्वी ज्या ठिकाणी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती कार्यरत होती ते ठिकाण वैधरित्या त्याच्या ताब्यात असणे आवश्यक राहील.

(छ) अनुज्ञप्ती नमुना एफएल-३ बाबत दिनांक १ एप्रिल २०१५ पूर्वी ज्या ठिकाणी अनुज्ञप्ती कार्यरत होती त्या ठिकाणी खाद्यगृह कार्यरत असणे आवश्यक आहे.

(ज) ज्या परवानाधारकांना आजीवन कालावधीसाठीचा नमुना एफएल-एक्ससी परवाना मंजूर असेल व सदर परवान्याची मूळ प्रत परवानाधारकाकडे उपलब्ध असेल तर असा परवाना वैध राहील.

(झ) अनुज्ञप्ती नमुना टीडी-१, ही ताडी दुकाने लिलावाबाबत नवीन लिलाव नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर नव्याने रितसर कार्यरत होतील.

(ट) महाराष्ट्र दारुबंदी कायद्याअंतर्गत केलेले नियम व नियमावली मध्ये सध्या प्रचलित असलेल्या तरतुदीनुसार इतर जिल्ह्यातून चंद्रपूर जिल्ह्यात अनुज्ञप्तींचे स्थलांतरण करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वल्सा नायर-सिंह,**
शासनाचे प्रधान सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 8th June 2021

*Order*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS-0321/CR-57/EXC-3.— Whereas the Government of Maharashtra had *vide* Government Order, Home Department, No. MIS-0111/CR-5/EXC-3, dated the 5th March 2015, prohibited the grant of licences and permits specified in the Schedule appended thereto in the Chandrapur District of the State with effect from the 1st April 2015 ;

And whereas, the State Government had *vide* Government Resolution, Home Department, dated the 12th January, 2021, appointed the Ramanath Jha Committee to examine and to do comprehensive study of the liquor ban in Chandrapur District ;

And whereas, the State Government has, after considering the report of Ramanath Jha Committee alongwith report of review committee of Collector, Chandrapur and representations received, decided to lift the prohibition in Chandrapur District ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(b)* and *(n)* of sub-section *(1)* of section 139 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) read with section 21 of the Maharashtra General Clause Act (I of 1904), the Government of Maharashtra, hereby rescind the Government Order, Home Department, No. MIS-0111/CR-5/EXC-3, dated the 5th March 2015, with effect from date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

2. For the removal of doubts, it is hereby declared that any such licences and permits granted before the 1st day of April 2015 and which were in force till the 31st day of March, 2015 and specified in the Schedule appended to the said Order dated the 5th March 2015, are permitted to be re-granted on fulfilment of the following conditions, namely :—

(*a*) The said licence has not shifted out of Chandrapur district during the interim period.

(*b*) The eligible licence-holder applies for re-grant in the financial year 2021-2022.

(*c*) The licence fees for the year 2021-22 as notified by the Commissioner, State Excise, Maharashtra State *vide* Notification No. BPA.112021/2021-22/VII, dated the 28th January 2021, shall be paid in the Government treasury and the challan for the same shall be produced with the application for re-grant.

(*d*) An undertaking to the effect that the licence-holder has not been convicted under the relevant sections mentioned in clause *(d)* of sub-section *(1)* of section 54 of the Maharashtra Prohibition Act in the interim period.

(*e*) The licence-holder has valid possession of the premises where his business was being conducted previously before the 1st April 2015.

(*f*) In case of a licence-holder in Form FL-III the eatery shall be functional where previously the licence was operational.

(*g*) Those permits in Form FL-XC which were granted for lifetime purposes shall be valid if the permit-holder has retained the original permit.

(*h*) The licences in Form TD-I shall only be operational when the notice for new auction of Toddy shops is published.

(*i*) Shifting of liquor licences from other district to Chandrapur district shall be allowed as per prevalent rules and regulations under Maharashtra Prohibition Act, 1949.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VALSA NAIR-SINGH,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.